# महाराष्ट्र शासन

क्र. संकीर्ण-२०१७/(१४/१७)/एस.डी.६
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मादाम कामा रोड , हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
ईमेल - sd6.sesd-mah@gov.in
दिनांक :- २५ जानेवारी, २०१७.

प्रति,

१. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व).
२. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
३. विभागीय शिक्षण उप संचालक,
सर्व विभाग.

शिक्षण (माध्यमिक) विभाग जि. प. कोल्हापूर.
श्री. श्रीमती
10 FEB 2017
नोंदणी क्र.

**विषय**:- एपीडरमोलिसिस बुलोसा (Epidermolysis Bullosa) पुरेशी त्वचा विकसित न होणे या आजाराने ग्रस्त असलेल्या बालकांना प्राधान्याने प्रवेश व शाळेत घ्यावयाच्या काळजीबाबत मार्गदर्शक सूचना.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ (RTE Act, २००९) अंतर्गत बालक यांचा अर्थ ६ ते १४ वर्ष वयोगट व विशेष गरजा असणा-या बालकांसाठी १८ वर्षापर्यंत आहे. या अधिनियमातील प्रकरण २, भाग ३(२) नुसार नमूद असलेल्या अपंग व्यक्ती अधिनियम (समान संधी हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) १९९५ अन्वये प्रकरण क्रमांक ५ मधील कलम क्रमांक २६ (अ) नुसार, प्रत्येक विशेष गरजा असणा-या बालकांना नजिकच्या सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व माध्यमांच्या मान्यता प्राप्त शाळांमध्ये वयाच्या १८ वर्षापर्यंत सुयोग्य व संचारमुक्त वातावरणात प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षण पूर्ण करण्यासाठी नियमित शाळेत प्रवेश व त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे बंधणकारक आहे. सदर बालकांमध्ये अंशत: अंध, पूर्णत: अंध, श्रवणदोष, अस्थिव्यंग, मतिमंदत्त्व, मानसिक आजार, बधिरांध, मस्तिष्क पक्षघात, स्वमग्न, तीव्र बहुविकलांग, इत्यादी बालकांचा समावेश आहे.

RTE Act-२००९ अधिनियमाची निर्मिती करतेवेळी प्रामुख्याने विशेष गरजा असणा-या बालकांचा शिक्षणाबाबत विचार करण्यात आला आहे. विशेष गरजा असणारी बालके ही इतर बालकांपासून वेगळे ठेवले जाणार नाही, अथवा त्यांचे वर्ग इतर बालकांसाठी भरविण्यात येणा-या वर्गाच्या ठिकाणापेक्षा व वेळेपेक्षा वेगळ्या ठिकाणी व वेळी भरविण्यात येणार नाहीत, त्यांच्यामध्ये भेदभाव होऊ नये त्यांना सापत्नभावाची वागणूक दिली जाणार नाही. त्यामुळे सदर बालकांचा दुर्बल व वंचित घटकातील बालके यात समावेश करुन महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २०११ मधील भाग चार मधील कलम ७ मध्ये नमूद करण्यात आले आहे.

वरील विशेष गरजा असणारी बालके शालेय शिक्षण घेताना अडचणीत असतात त्याचप्रमाणे **एपीडरमोलिसिस बुलोसा (Epidermolysis Bullosa) पुरेशी त्वचा विकसित न झाल्याने** त्वचा कमकुवत राहणे व घर्षणाने त्या भागात फोड येणे परिणामी स्नायू कमकुवत होतात. परिणामी, अध्यापनाच्यावेळी, शालेय परिसरात हालचाली करण्यास, बसण्यास, लिखाण, जेवण करण्यास, बॅग हाताळताना, शाळेत ये-जा करण्यास अडचण निर्माण होतात. जगभराच्या संशोधनात सदर विद्यार्थी दरलाख मुलामागे ५ ते ६ बालके आढळून येतात. त्याअनुषंगाने, ज्याप्रमाणे विशेष गरजा असणा-या अस्थिव्यंग, बहुविकलांग किंवा मस्तिष्क पक्षघात असणा-या विद्यार्थ्यांना स्नायू, हाडे व सांध्यांतर्गत दोष असतात परिणामी

अध्यापनात अडचणी येतात. याच धर्तीवर **एपीडरमोलिसिस बुलोसा (Epidermolysis Bullosa)** या प्रकारात आढळून आलेल्या विशेष गरजा असणा-या बालकांना पुढीलप्रमाणे शैक्षणिक व सहाय्यभूत सुविधा देण्यात याव्यात.

१) प्राधान्याने प्रवेश देण्यात यावा.
२) शैक्षणिक संसाधन कक्षाची व्यवस्था करणे.
३) उपलब्ध थेरेपी / डे केअर सेंटरमध्ये पूर्व कौशल्य विकसित करणे.
४) आवश्यकतेनुसार साहित्य, साधने व उपकरणे उपलब्ध करुन देणे.
५) रॅम्प्स, हॅडड्रील्ससह अडथळा विरहित परिसर व अडथळ्या विरहित वर्गात बसण्याची व्यवस्था करावी.
६) मदतनीस म्हणून पालकाचे सहकार्य घ्यावे.
७) वर्गात समायोजन होईपर्यंत सदर पालक विद्यार्थ्यासोबत शाळेत उपस्थित राहण्यास परवानगी देणे.
८) सदर विद्यार्थ्यांना शाळा सुटण्याअगोदर १० मिनिटे आधी सोडण्यात यावे.
९) अनुकूलित पाठ्यपुस्तके, ऑडिओ सीडीज स्वयंअध्यनाच्या दृष्टीने उपलब्ध करुन देणे.
१०) प्रथमोपचार पेटी उपलब्ध करुन ठेवणे.
११) सदर बालकांच्या वैद्यकीय उपचाराबाबतचे दस्ताऐवज उपलब्ध करुन घेणे.
१२) आवश्यकतेनुसार शैक्षणिक सहाय्यासाठी विशेष शिक्षकांची मदत देणे.

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सवलतीबाबतचे शासन निर्णय दि.८ जानेवारी २०१६ व शासन परिपत्रक दि.१५ फेब्रुवारी, २०१६ मधील तरतुदीनुसार विशेष गरजा असणारे विद्यार्थी म्हणून सदर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा व अडचणी ओळखून शैक्षणिक सवलती देण्यात याव्यात.

सदर पत्र महाराष्ट्रातील सर्व व्यवस्थापनाच्या शाळांना लागू राहील.

(डॉ.सुवर्णा खरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-

१. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य.
२. आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. आयुक्त, कुटुंब कल्याण तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य मिशन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. आयुक्त, महिला व बालविकास कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. शिक्षण संचालक (प्राथ), शिक्षण संचालनालय, पुणे.
६. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, पुणे.
७. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
८. संचालक, सार्वजनिक आरोग्य सेवा, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, मुंबई.
९. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. पाचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सर्व जिल्हे.
११. अधिष्ठाता, सर्व वैद्यकीय महाविद्यालय.
१२. विभागीय उप संचालक, आरोग्य (सर्व).
१३. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, सर्व जिल्हे.
१४. जिल्हा वैद्यकीय अधिकारी, जिल्हा सामान्य रुग्णालय, सर्व जिल्हे.
१५. शिक्षणाधिकारी/शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, (सर्व).
१६. जिल्हा परिषद/ महानगरपालिका समन्वयक, समावेशित शिक्षण, जिल्हा परिषद/ महानगरपालिका (सर्व).
१७. वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, सर्व तालुके.
१८. वैद्यकीय अधिकारी, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम पथक, सर्व तालुके.